## नियमित फौजदारी खटला क्र.२५/२०१७ मधील निशाणी क्र.१ खाली आदेश

## (पारीत दिनांक १६ ऑक्टोबर, २०२५)

प्रकरणातील कागदपत्रांचे व रोजनाम्याचे अवलोकन केले असता असे दिसुन येते की, सदरचे प्रकरण हे दि.०४.०२.२०१७ रोजी दाखल करण्यात आले. तदनंतर आरोपींविरुध्द् दि.०३.०२.२०१७ रोजी आदेशिका जारी करण्यात आली. आरोपी हजर झाल्यानंतर दोषारोपपुर्वीचे फिर्यादीतर्फे दोन साक्षीदारांचे जबाब नोंदवण्यात आले. तदनंतर आरोपींविरुध्द दि.२५.०९.२०१८ रोजी भारतीय दंड विधान कलम ३२४, ३२३, ५०४, ५०६ सह ३४ अन्वये दोषारोप निश्चित करण्यात आले. फिर्यादीचे दोषारोप निश्चीतीपुर्वीचे जबाबाच्या अनुशंगाने दि.२३.०१.२०२० रोजी उलटतपास घेण्यात आला परंतु, फिर्यादीचा साक्षीदार क्र.२ हनुमंत निगडे हे मात्र आजतागायत उलटतपासाकरीता प्रकरणात हजर झाले नाहीत. प्रकरणातील आरोपी हजर राहत असल्याचे रोजनाम्यावरुन दिसुन येते. त्यानंतर सदर प्रकरण दि.१७.१०.२०२४ रोजी निशाणी १ वर आदेश पारीत करुन खारीज आदेशास्वत नेमण्यात आले असुनही फिर्यादीने पुराव्यासंबंधाने कोणतीही कार्यवाही केली नाही.

२. सदर प्रकरण हे ८ वर्ष जुने असुनही प्रकरणात फिर्यादीतर्फे साक्षीकामी कार्यवाही केली जात नाही. आजरोजी आरोपी व आरोपींचे वकील हजर. एकंदरीत सदर प्रकरणात फिर्यादीस पुरावा दाखल करण्यास संधी देवुनही त्यांनी पुराव्याच्या अनुशंगाने साक्षीदार क्र.२ यांना हजर करण्याबाबत कार्यवाही केली नाही. करीता, फिर्यादीचा पुरावा बंद करण्यात येतो. आरोपींविरुध्द अभीलेखावर पुरावा आल्याने प्रकरण आरोपींचे फौ.प्र.सं. ३१३ चे निवेदनकामी नेमण्यात येते.

SHAILENDRA NANDKISHOR PATIL
(एस.एन. पाटील)

Digitally signed by SHAILENDRA NANDKISHOR PATIL
Date: 2025.10.16 17:09:23 +0530

दौंड. प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी,
दि.१६/१०/२०२५ न्यायालय क्र.२, दौंड, जि. पुणे

# <u>CERTIFICATE</u>

"I affirm that the contents of this PDF file judgment/order are same word for word as per original judgment"

| | | |
|---|---|---|
| Name of Steno | : | M.M. Chintale |
| Court name | : | Shri. S.N. Patil<br>Judicial Magistrate F.C. Court No.2, Daund<br>Tq. Daund, Dist. Pune |
| Date of order | : | 16.10.2025 |
| Order signed by<br>Presiding Officer on | : | 16.10.2025 |
| Order uploaded on | : | 17.10.2025 |